ग्राहकांचा विश्वास व सुरक्षितता हेच आमचे ध्येय!
सर्व प्रकारचे कर्ज त्वरित उपलब्ध!
सुरक्षित ठेव आकर्षक व्याजदर
१२ तासांत वाहन कर्ज सुविधा
कान्हूर पठार पतसंस्था
मुख्य कार्यालय : कान्हूर पठार, ता. पारनेर
फोन : (०२४८८) २८३२४८

www.nagarsahyadri.com
संपादक - शिवाजी शिर्के

# नगर सह्याद्री

माऊली ट्रेडिंग कंपनी
बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स टाइल्स, ग्रॅनाइट, सॅनिटरी वेअर, प्लंबिंग
४० प्रकारचे ग्रॅनाइट उपलब्ध
नगर-पुणे रोड, सुपा, प्लॉट क. १६/९, गेस्ट हाऊस समोर, सुपा, ता. पारनेर, जि. अहमदनगर-४१४३०१ maulitrading99@gmail.com
सुखदेव पवार ९८५००२८७३० / सागर फलके ७७५६८४९४७९ / संदिप लोहाडे ९९६०२२७३००

अहिल्यानगर । वर्ष १२ । अंक ९९, मंगळवार, दि. १८ फेब्रुवारी २०२५ । किंमत - ३ रुपये (पाने ४) ∎ ANR/055/2021-2023 । RNI No. MAHMAR/2013/59865 ∎ nagarsahyadri@gmail.com

# मृत व्यक्ती डायरेक्टर दाखवत मांडला बाजार!

## ‘क्लासिकब्रीज’ अन् ‘आगमन’ या कंपन्यांच्या माध्यमातून प्रचंड लूट । नगरसह पश्चिम महाराष्ट्रात संदीप थोरात टोळीने घातला धुमाकूळ

तीन महिन्यांत दामदुप्पट, दाम तिप्पट व महिन्याला १० ते १२ टक्के जादा परताव्याचे आमिष दाखवणाऱ्या कंपन्यांचे नेटवर्क उभे करण्याच्या लालसेत पारंगत ठरलेल्या संदीप थोरात याने त्याच्याच सह्याद्री मल्टिनीधी कंपनीत कर्मचारी राहिलेल्या सचिन साबळे याला आगमन या दुसऱ्या कंपनीत संचालक दाखवल्याचे धक्कादायक समोर आले आहे. वास्तविक सचिन साबळे याचा सहा महिन्यांपूर्वीच एका अपघातात मृत्यू झाला आहे. साबळे मृत झाल्याचे माहिती असतानाही तो जिवंत असल्याचे दाखवत संदीप थोरात याने स्वत:चे नाव लपवत सचिन साबळे याच्या नावाने आगमन ही कंपनी सुरू केली. त्याच नावाखाली लाखो रुपयांची माया जमविली असल्याची माहिती समोर आली आहे. सचिन साबळे हा मयत झाला असतानाही त्याच्याच नावाने डायरेक्टर म्हणून आजही व्यवहार झाले आहेत आणि आता कायदेशीर भानगड निर्माण झाली तर मयत व्यक्तीच्या विरोधात म्हणजेच सचिन साबळे याच्या विरोधात काय कारवाई होणार? सचिन साबळे हा सह्याद्रीचा कर्मचारी! सचिन साबळे आणि विश्वास पाटोळे यांची ‘आगमन’च्या नावाने कंपनी दाखवली. त्यात हे दोघे पार्टनर दाखवले. त्यातील विश्वास पाटोळे हा संदीप थोरात याच्याकडे आजही चालक म्हणून काम करतो तर सचिन साबळे हा देखील कर्मचारीच!साबळे याची कागदपत्रे वापरत संदीप थोरात याने आगमन नावाची कंपनी नोंदवली. त्यात साबळे आणि पाटोळे हे दोघेच डायरेक्टर! यापैकी सचिन साबळे हा सहा महिन्यांपूर्वीच मयत झाला. संचिन साबळे हा मयत झालेला असताना आजही त्या कंपनीच्या रेकॉर्डवर डायरेक्टर असल्याचे दिसते. याबाबत कोणतेही कायदेशीर सोपस्कर निर्माण झाले तर त्यात कागदोपत्री संदीप थोरात हे नाव कोठेच येणार नाही. त्यातील सचिन साबळे हा तर सहा महिन्यांपूर्वीच मयत झालेला. मयत व्यक्तीच्या नावाने आजही सारे बँकींग होत आहे. या कंपनीच्या नावाखाली झालेले व्यवहार आणि रोकड संदीप थोरात याच्या ताब्यात आली असली तरी त्याचे त्याने अत्यंत व्यवस्थीत प्लॅनिंग केल्याचे दिसते. अत्यंत चतुराई अन् हातचलाखीने संदीप थोरात याने त्याच्या दोन कर्मचाऱ्यांच्या नावावर क्लासीकब्रीज अन् आगमन हे दुकान चालवले. त्यातील एक मयत झाला असतानाही त्याच्या नावाचा वापर करणे संदीप जाधव याने चालूच ठेवले.

### शाखा असल्याचे भासवून संदीपने अनेकांना गंडवले!

नगर शहरातील ठेवीदारांना लुटणाऱ्या संबधित मल्टीसिटी निधी कंपनीच्या ज्या २९ निधी कंपन्या दाखविण्यात आल्या (संदीप थोरात त्याला शाखा म्हणायचा) त्यातील १६ कंपनी मध्ये संदीप थोरात स्वत: संचालक आहे. प्रत्येक निधी कंपनीचा नोंदणी क्रमांक वेगळा आहे. निधी कंपनी स्थापन करताना त्याचे स्वतंत्र बँक खाते उघडणे आवश्यक असते. मात्र, संदीप थोरात सर्व २९ निधी कंपनीची रोकड रक्कम गोळा करून स्वत:कडे मागवून घ्यायचा. त्यासाठी त्याने एक चारचाकी गाडी ठेवली होती. थोरातकडे येणारी कॅश कोठे जात होती ते फक्त आणि फक्त त्यालाच माहिती होते. थोरात हा सर्व २९ निधी कंपनीचा ई मेल आय डी एकच ठेवत होता. संदीप थोरात याने वाळकी गावातील एस टी महामंडळाच्या बँकेमध्ये सेवानिवृत्त झालेल्या मामा भालसिंग याला मुख्य कार्यकारी अधिकारी नेमले होते. त्याच्या माध्यमातून थोरात याने अनेकांना गंडा घातला.

### किराणा दुकानच्या चोपडीत संदीप नोंदवायचा ठेव रकमा!

संदीप थोरात याचा वेगळाच फंडा आहे. निधी कंपनी मधील कर्मचाऱ्यालाच ठेवी गोळा करायला तो लावत असे. निधी कंपनी मधील सर्व व्यवहाराच्या नोंदी संगणीकृत ठेवणे आवश्यक होते. मात्र त्याचा हिशोब किराणा दुकाना सारखा एका वहीत होता. संदीप थोरात हा बाहेर फायनान्सचा फलक लावायचा व आत त्याचे निधी कंपनीचे कामकाज चालयाचे. प्रत्येक निधी कंपनीचे अस्तित्व वेगळे असताना त्याला तो शाखा म्हणायचा. अतिशय धूर्त व चाणाक्षपणे लुटण्याचे काम संदीप थोरात याने नगर शहर तसेच जिल्ह्यात केले आहे. बँकिंग क्षेत्रामध्ये कुठलाही अनुभव नसलेला संदीप याने नगर शहर तसेच जिल्ह्याच्या आर्थिक क्षेत्रात उच्छाद मांडला आणि विश्वासार्हता संपवून टाकली.

### मनी लॉंड्रिंगसाठी थेट पश्चिम बंगाल गाठले अन् विघ्नहर होल्डिंग्ज कंपनी दाखवली!

पश्चिम बंगालमधील कोलकत्याची आरओसी नोंदणी दाखवत संदीप थोरात याने कोलकत्ता शहरात विघ्नहर होल्डींग्ज प्रा. लि. ही कंपनी स्थापन केली. या कंपनीचे कोलकत्यात त्याने जागा मिळवली. दि. १७ फेब्रुवारी १९९५ रोजी त्याने या कंपनीची नोंदणी केली. दोन कोटी रुपयांचे भागभांडवल कंपनीकडे असल्याचे आरओसी घेताना दाखविण्यात आले. यापैकी एक कोटी पाच लाख रुपयांचे भागभांडवल कंपनी डायरेक्टर म्हणून दाखविण्यात आलेल्या संदीप सुधाकर थोरात आणि प्रिती ग्यानस्वरुप संगवान या दोघांचे दाखविण्यात आले. या दोघांनी मिळून ही कंपनी स्थापन केल्याची नोंद आहे. पश्चिम बंगाल, कोलकत्तामध्ये 13 A, Rabindranath Road Nabagram Hooghly Hooghly WB 712246 IN असा पत्ता असल्याचे त्यात म्हटले आहे तर संपर्कासाठी दुसरा पत्ता नोंदवताना तो नगरचा देण्यात आला. त्यानुसार S.NO.101/86, SAI MIDAS TOUCH, NAGAR MANMAD ROAD SAVEDI, AHMEDNAGAR-414001 MAHARASTRA INDIA AHMEDNAGAR MH 414001 IN असा पत्ता देण्यात आला आहे. दि. ३० सप्टेंबर २०२२ रोजी कंपनीची शेवटची वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्याचे यामध्ये दाखविण्यात आले आहे. कंपनीचा ई मेल आय डी preetigsangwan@gmail.com असा देण्यात आला आहे.



स्पेशल रिपोर्ट
शिवाजी शिर्के, संपादक
९४२२२२१७६१

### अर्थतज्ज्ञाला लाजवणारी संदीप थोरातची ‘ती’ फेसबुक पोस्ट आली चर्चेत!

अनेकांना ठगविणाऱ्या संदीप थोरात याची फेसबुक पोस्ट सध्या चर्चेत आली आहे. दि. २५ मे २०२४ रोजी त्याने त्याच्या फेसबुक पेजवर ‘आर्थिक संस्था बंद पडल्यावर चेअरमनने पळून जाणे म्हणजे निव्वळ मूर्खपणा- संदीप थोरात’ या मथळ्याखाली ही पोस्ट टाकली आहे. आर्थिक संस्था चालकांनी, संचालकांनी काय भान जपावे आणि काय करावे असे उपदेशाचे डोस त्याने या पोस्टच्या माध्यमातून पाजले. त्याची ही पोस्ट जशीच्या तशी! ही पोस्ट वाचल्यावर संदीप थोरात हा मोठा अर्थतज्ज्ञ असल्याचा भास होतो. प्रत्यक्षात हा अत्यंत मोठा फ्रॉडर निघाला. त्याच्या २४ शाखा असल्याच्या दावा करताना या सर्व शाखा आता बंद दिसत असल्या तरी त्या दि. १ जुलै २०२४ पासून पुन्हा सुरू होतील असेही त्याने त्या पोस्टमध्ये म्हटले आहे. वास्तविक सह्याद्रीच्या या शाखा नव्हत्याच! त्या वेगवेगळ्या नावाने त्या गावात सुरू केलेल्या कंपन्या होत्या. मात्र, संदीपने हे लपून ठेवले आणि शाखा असल्याचे समोर आणले. तो या पोस्टमध्ये पुढे म्हणतो, ‘आणि जर माझा संयम तुटला असता,मी जर संकटासोबत लढलो नसतो,पळून जाण्याचा विचार केला असता,तर ठेवीदारांचे पैसे बुडाले असते,संचालक मंडळ अटक असत आणि मी देखील.....’. ठेवीदारांना गंडविणाऱ्या पतसंस्था चालकांबद्दल बोलताना सर्वात शेवटी तो या अशा पतसंस्था चालकांना ‘नालायक साले’ असे म्हणून मोकळा झाला.

### चहावाला दीपक कराळे याच्यावर आपबिती!

पुण्यात चहाचे दुकान असणाऱ्या दिपक कराळेला हा पूर्वी याच संदीप थोरात याच्याकडे कर्मचारी होता. त्याची कादगपत्रे वापरत त्याला क्लासीकब्रीज या कंपनीत संचालक केल्याचे दाखवले. ‘नगर सह्याद्री’ने संदीप थोरात याच्या भानगडी बाहेर काढण्याच्या आदल्या दिवसापर्यंत संदीप थोरात आणि दिपक कराळे हे दोघेही या कंपनीचे संचालक म्हणून कागदोपत्री दिसून येत होते. कंपनी पोर्टलवरही त्यांची नावे दिसत होती. मात्र, संदीप थोरात याने त्याचे संचालक म्हणून त्या कंपनीवरील नाव शनिवारी सायंकाळी हटवल्याचे समोर आल आहे. आता दिपक कराळे हा एकटाच संचालक असल्याचे त्या कंपनीच्या पोर्टलवर दिसते. संदीप थोरात यात जर दोषी नव्हता तर त्याने त्याचे नाव का हटवले असा प्रश्न यातून समोर येत आहे.

### पोलिसांत गेलात तर पैसे बुडणार, अशी धमकी द्यायचा!

क्लासीकब्रीजमधून जमा केलेले पैसे त्याने सह्याद्रीमधील गुंतवणूकदारांना थोडे थोडे करत दिले. जे देतोय ते घ्या, असे म्हणत त्याने गुंतवणूकदारांना दिलासा देण्याचे काम केले. जर माझ्या विरोधात पोलिसात गेला तर तुमचे आहे ते पैसे बुडतील अशी धमकीही त्याने दिली. त्यापेक्षा मी जे देतोय ते घ्या असे म्हणत त्याने गुंतवणूक केलेल्या रकमेतील दहा - पाच टक्के रक्कम दोन- तीन महिन्यातून एकदा काहींना दिली. मात्र, ही टक्केवारी फक्त दोन टक्के आहे.

### गुंतवणूकदारांना ६० टक्क्यांचे आमिष तर कमिशनच्या फंड्याला कर्मचारी पडले बळी!

संदीप थोरात हा त्याच्या निधी कंपनी मधील कर्मचाऱ्यांना ठेवी जमा करायला लावायचा. वास्तविक त्यांना याचा कोणताही परवाना नव्हता. कर्मचाऱ्यांना या बदल्यात एक लाख ठेवीस पाच हजार रुपये कमिशन दयायचा तसेच या साठी त्याने कमिशन वर काही दलाल ही त्याने नेमले होते. स्वयंघोषीत उद्योग समूहच त्याने दाखवला होता. वास्तविक त्या नावाखाली ठेवीदार व गुंतवणूक दाराना लुटण्याचे उद्योग त्याने केले. एखादा ठेवीदार याच्याकडे आल्यानंतर, ‘तुम्हाला माझ्या कंपनी मध्ये १२ ते १८ व्याज मिळेल पण माझ्याकडे खाजगी ठेवल्यास तुम्हाला ६० टक्के व्याज मिळेल. मी ते पैसे शेअर मार्केट मध्ये लावतो मला तिथे जास्त परतावा मिळतो. तसेच मी सिक्युरिटीसाठी मी तुम्हाला माझ्या उद्योग समूहचा चेक देतो असे तो सांगायचा. यावर विश्वास ठेवत अनेकांनी त्याच्याकडे रकमा दिल्या. आज त्या साऱ्यांना पश्चाताप आल्याचे समोर आले आहे.

### पावत्या हस्तलिखित देण्याचा फंडा!

सह्याद्रीमधील सर्व शाखांमध्ये जमा होणारी कॅश एका चार चाकी वाहनाद्वारे स्वत: संदीप थोरात हाच घेऊन जायचा! शाखेत जमा होणाऱ्या ठेवीचे कुठल्याही संगणीकृत नोंदी न होता रजिस्टर व साध्या हाताने लिहिलेल्या ठेव पावत्या दिल्या जात असत.

### शब्दांचा अपभ्रंश करून लुटण्याचे काम झाले!

फायनान्स कंपनी असल्याचे भासवत संदीप थोरात याने मोठी नामी शक्कल चालवली. थोरात आणि टोळीने निधी/ मल्टीसिटी/ मल्टीपर्पज/ मल्टीस्टेट/ फायनान्स या शब्दांचा अप्रभंश करून लुटण्याचे काम केले आहे. वास्तविक पाहता शब्दांचा अपभ्रंश करत वरीलपैकी कोणत्याही नावाने कंपनी नोंदणी केली गेली. यातील एकालाही रकमा स्वीकारण्याचे, त्यांना व्याज देण्याचे अथवा बँकींग- पतसंस्था यासारखे व्यवहार करण्याचे अधिकार नव्हते आणि नाही. मात्र, संदीप थोरात याने अत्यंत बेमालूमपणे हा सारा खेळ खेळला आणि त्यात अनेकजणां आपली पुंजी गमवावी लागली. संदीप थोरात याच्या कोणत्याही कार्यालयात शासनाची मान्यता असणारा परवाना कधीच दिसून आला नाही.

## NEWS Update

### दिल्ली हादरली

नवी दिल्ली - दिल्ली-एनसीआरमध्ये सोमवारी सकाळी भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाची तीव्रता ही रिश्टर स्केलवर ४.० मोजली गेली असून त्याचे केंद्र दिल्लीच्या आसपास जमिनीपासून ५ किलोमीटर खोलीवर असल्याचे सांगितलं जात आहे. पहाटे ५.३६ वाजता हा भूकंप झाल्याची माहिती आहे, यामुळे लोकांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. काही सेकंदांपर्यंत भूकंपाचे धक्के इतके तीव्र होते की लोक खबरदारी म्हणून ते तात्काळ घराबाहेर पडले. या भुंकपाच्या धक्क्यामुळे काही सेकंद घरे, इमारती थरथरू लागल्या होत्या. सुदैवाची बाब म्हणजे सध्या जीवितहानी किंवा वित्तहानी झाल्याचं वृत्त समोर आलेले नाही. दिल्लीतील भूकंपाच्या धक्क्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी ट्वीट करत लिहिले की, दिल्ली आणि आसपासच्या भागात भूकंपाचे धक्के जाणवले. सर्वांनी शांत राहण्याचे आणि सुरक्षिततेच्या खबरदारीचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. अधिकारी परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहेत. या भूकंपामुळे आतापर्यंत कोणतीही जीवीतहानी अथवा कोणत्याही मालमत्ताचे नुकसान झाल्याची माहिती समोर आलेले नाही.

### चौघांची आत्महत्या

कर्नाटक : कर्नाटकच्या म्हैसूरमध्ये सोमवारी खळबळजनक घटना घडली आहे. एका अपार्टमेंटमध्ये एकाच कुटुंबातील चार जणाचे मृतदेह आढळले. त्यामध्ये नवरा-बायको, मुलगा अन् ६२ वर्षीय महिलेचा समावेश आहे. हत्या की आत्महत्या याचा पोलीस तपास करत आहेत. प्राथमिक तपासातून आत्महत्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. म्हैसूरमधील विश्वैरया नगरमधील एका अपार्टमेंटमध्ये सोमवारी सकाळी एकाच कुटुंबातील चार जणांचे मृतदेह आढळले. मृतामध्ये व्यवसायिकाचा समावेश आहे. चेतन (४५ वर्ष), पत्नी रूपाली (४३ वर्ष), मुलगा कुशाल (१५ वर्ष),चेतन यांची आई प्रियंवदा (६२ वर्ष) अशी मृताची नावे आहेत. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून चौकशीला सुरूवात केली आहे.

# थकबाकीदारांवर जप्तीचा बडगा

## आयुक्त यशवंत डांगे यांचे आदेश । २०४ कोटींचा थकीत कर

अहिल्यानगर । नगर सह्याद्री

मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या वसुलीसाठी वारंवार सवलत देऊनही थकबाकीदार कर भरण्यास टाळाटाळ करत आहेत. परिणामी, थकबाकी २०४ कोटींवर पोहोचली आहे. शास्तीमध्ये १०० टक्के सवलत देऊनही अवघे १३ कोटीच वसूल झाल्याने महानगरपालिकेच्या आर्थिक अडचणी वाढत आहे. वीजबिले, अत्यावश्यक खर्चाची देयके मोठ्या प्रमाणात थकीत आहेत. वसुली होत नसल्याने विविध योजनांमध्ये स्वहिस्सा भरण्यासाठी महानगरपालिकेत निधी उपलब्ध नाही. अवघी २५ टक्केच वसुली झालेली



असल्याने आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी थकबाकीदारांवर जप्ती कारवाई तीव्र करण्याचे आदेश प्रभाग अधिकाऱ्यांना दिले आहेत.

महानगरपालिकेच्या कराची थकबाकी २१५ कोटींवर पोहोचल्याने मागील महिन्यात आयुक्त यशवंत डांगे यांनी १०० टक्के शास्ती माफ केली. त्याला मुदतवाढही दिली. तरीही फक्त १३ कोटींचीच वसुली झाली आहे. पाणी पुरवठ्याची वीजबिले, जलसंपदा विभागाची थकीत देणी, इतर अत्यावश्यक सेवांची देणी थकली आहेत. आजमितीला महानगरपालिकेला ४९६ कोटी रुपयांची देणी आहेत. सद्यस्थितीत २०४ कोटी थकीत असल्याने आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. विविध देणी देण्याबरोबरच शासकीय योजनांचा स्वहिस्सा भरण्यासाठी महानगरपालिकेत निधी उपलब्ध नाही.

राज्य सरकारने ▶ पान २ वर

### माळीवाडा बसस्थानक परिसरात

# रिक्षाचालकांत राडा



छाया / सुनिल नाईकवाडी

अहिल्यानगर । नगर सह्याद्री

नगर शहरातील माळीवाडा बसस्थानकाबाहेर दोन रिक्षा चालकांत तुफान राडा झाल्याची घटना घडली. यात एका रिक्षाचे मोठे नुकसान झाले. सोमवारी दुपारच्या सुमारास हा प्रकार घडला असून कोतवाली पोलीस अधीक तपास करीत आहेत.

शहरातील माळीवाडा बसस्थानकाच्या मागील बाजूस, हॉटेल फेमस समोर असलेल्या रिक्षा स्टँडवर दोन रिक्षा चालकांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या झटापटीत ▶ पान २ वर

# व्यावसायिकावर हल्ला

## रोख रक्कम, सोने लांबविले । एमआयडीसीत गुन्हा

अहिल्यानगर । नगर सह्याद्री

टोळक्याने धारदार शस्त्र, फायटर, लोखंडी रॉड, लाकडी दांडक्याने तरूण व्यावसायिकावर हल्ला करून जखमी केले. त्यांच्याकडील सोन्याची चैन व रोख रक्कम लुटल्याची घटना एमआयडीसीच्या सम्राट चौकात गुरूवारी (१३ फेब्रुवारी) रात्री ८:३० वाजताच्या सुमारास घडली. ज्ञानेश्वर बाळु साठे (वय ३७ रा. निंबळक, ता. नगर) असे हल्ला झालेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. त्यांच्यावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

त्यांनी उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात शनिवारी (१५ फेब्रुवारी) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संकेत सुभाष संसारे (रा. निंबळक ता. नगर), गणेश सोनू कदम, अभिषेक उर्फ भोऱ्या अरूण भिंगारदिवे, विशाल उर्फ छोटू पाटोळे, करण ▶ पान २ वर

# मुलाचे अपहरण

अहिल्यानगर । नगर सह्याद्री

खेळण्यासाठी घराबाहेर गेलेल्या अल्पवयीन मुलाचे (वय १४) अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना शनिवारी रात्री बोल्हेगाव परिसरातील प्रेम भारतीनगर येथे घडली. या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलाच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीवर तोफखाना पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी या भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांचा मुलगा बोल्हेगावातील हायस्कूल मध्ये शिक्षण घेत आहे. शनिवारी सकाळी १० वाजता ▶ पान २ वर

# शिंदे गट भाजपात विलीन होणार

## ठाकरे सेनेतील बड्या नेत्याचे भाकीत

मुंबई । नगर सह्याद्री

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत महायुतीला घव-घवीत यश मिळाले. यंदाच्या निवडणुकीत भाजप मोठा पक्ष ठरल्याने देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रिपदी विराजमान झाले. राज्यात सत्ता आल्यानंतरही महायुतीत सातत्याने काही ना काही कारणामुळे नाराजीनाट्य पाहायला मिळत आहे. महायुतीतील तीन घटक पक्षात या ना त्या कारणाने राजकीय कुरघोडी सुरु असतात. तसेच पालकमंत्रिपदाचा तिढाही अद्याप सुटलेला नाही. त्यातच आता एका बड्या नेत्याने शिंदेंच्या शिवसेनेबद्दल मोठे भाकीत केले आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी नुकतंच पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांना विविध राजकीय घटनांबद्दल प्रतिक्रिया विचारण्यात आले. यावेळी त्यांना एकनाथ शिंदे गटाच्या ऑपरेशन टायगरबद्दलही विचारण्यात आले. यावेळी त्यांनी एकनाथ शिंदे यांचं काम तमाम होणार आहे. शिंदे गट हा लवकरच भाजपाच विलीन होईल, असे भाकीत वर्तवले.

एक दिवस एकनाथ शिंदेंच्या पक्षाचा एकही आमदार निवडून येणार नाही. २०२९ ला चित्र पूर्ण बदललेले असेल. ▶ पान २ वर

# कुकडी डाव्या कालव्याचे आवर्तन सुटले

## आ. काशीनाथ दाते यांच्या पाठपुराव्याला यश

पारनेर | नगर सह्याद्री

कुकडी डावा कालव्यातून रविवारी दुपारी पाणी सोडण्यात आले असून पारनेर तालुक्यातील कुकडी कालव्याच्या लाभक्षेत्रात पाणी पो-हचले आहे. या आवर्तनामुळे लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा दिल-ासा मिळाला आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रश्न तात्काळ प्रश्न मार्गी लावल्याने निघ-ोज परिसरातील शेतकऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहे.

कुकडी कालव्याच्या लाभ क्षेत्रात पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे चारा पिके, फळबाग, इतर शेतीमाल जळण्याची भीती निर्माण झाली होती यामुळे आमदार काशिनाथ दाते सर यांनी ठरलेल्या आवर्तनाच्या पाच दिवस अगोदर पाणी सोडावे अशी आग्रही मागणी आ. काशिनाथ दाते सर यांनी शेतकऱ्यांचे मागणी प्रमाणे कार्यवाही व्हावी म्हणून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन पाठपुरावा केला होता. आमदार दाते सर यांच्या प्रश्नाची तात्काळ दखल घेऊन शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी ना. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी तात्काळ कुकडी प्रकल्पाचे मुख्य अभियंता हेमंत धुमाळ यांना आवर्तन सोडण्याचा आदेश त्यांनी दिला होता. त्यानुसार रविवारी ( दि १६ ) रोजी आवर्तन सोडण्यात आले आहे. शेतकऱ्यांना या आवर्तनाचा गरजेच्या वेळी सुटलेले असून अगोदर आवर्तन सुटल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष व निघोज अळकुटी जिल्हा परिषद गटाचे सर्वेसर्वा सचिन वराळ पाटील यांनी पाणी सोडल्याबद्दल आनंद व्यक्त करीत संबधीतांचे आभार मानीत धन्यवाद व्यक्त केले आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार काशिनाथ दाते सर यांनी शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेऊन जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला आहे. तसेच भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, माजी नगराध्यक्ष विजय औटी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, राळेगण थेरपाळ सरपंच पंकज कारखीले यांनी सातत्याने विकासाभिमुख भुमिका घेऊन पाण्याच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला असल्याची माहिती वराळ पाटील यांनी दिली आहे.

# शिक्षकांच्या प्रश्नांसाठी शिक्षणमंत्र्यांसोबत बैठक घेणार

## डॉ. सुजय विखे | शिक्षक संघाचे त्रैवार्षिक अधिवेशन

अहिल्यानगर | नगर सह्याद्री

अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसह प्राथमिक शिक्षकांच्या हजेरीबाबतच्या क्यूआर कोडचा विषय गाजत आहे. या विषयावर लवकरच शालेय शिक्षणमंत्री यांच्यासोबत बैठक लावण्याचे आश्वासन भाजपचे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिले. रविवारी नगरमध्ये आयोजित शिक्षक संघाच्या त्रैवार्षिक अधिवेशनात ते बोलत होते. यावेळी शिक्षक संघाचे राज्याचे नेते संभाजीराव थोरात, बाळासाहेब मारणे, डॉ. संजय कळमकर, राज्य शिक्षक संघाचे उपनेते रावस-ाहेब रोहकले, आबासाहेब जगताप, शिक्षक बँकेचे चेअरमन बाळासाहेब सरोदे, संजय शेळके, भास्कर नरसाळे, कैलास दहातोंडे, रावसाहेब शिंदे, कैलास चिंधे, सुरेश निवडुंगे, राजू साळवे यांच्यासह जिल्हा शिक्षक संघाचे पदाधिकारी व शिक्षक सभासद उपस्थित होते.



अधिवेशनादरम्यान मार्गदर्शन करताना डॉ. विखे पाटील म्हणा-ले, आम्ही जिल्ह्यातील शिक्षकांच्या पाठीशी असून शिक्षकांनी याची जाण ठेवावी. जिल्हा परिषद प्रशास-नाने लागू केलेल्या क्यूआर कोडला शिक्षकांचा विरोध असून या विषयातून सुवर्णमध्य काढण्यासाठी लवकरच शिक्षण मंत्र्यांसोबत बैठक लावण्यात येईल. कोणावरही अन्याय होण-ार नाही. शिक्षकांवर अविश्वास ठेवणे योग्य नसले तरी शिक्षकांनी देखील गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावे. जिल्ह्यात पालकमंत्री यांच्या माध्यमातून ५०० शाळा खोल्यांना मंजुरी देण्यात आली असून सर्व शाळा सौर योजने स्वयंपूर्ण करत त्या डिजिटल करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले. शिक्षकांची कामे कोण करतात, हे लक्षात ठेवा. अन्यथा पाच वर्षांनी शिक्षक हे विसरून जातील. मी स्वतः डॉक्टर असल्याने गरज असल्यास गोळी देखील देतो. मात्र, आम्ही केलेले काम लक्षात ठेवा. अधिकाऱ्यांनी जा-ताना चांगले काम करावे, म्हणजे लक्षात राहते, असा अप्रत्यक्ष सल्लाही डॉ. सुजय विखे यांनी जिल्हा परिषद प्रशासनाला दिला.

### बैठकीत शिक्षकांची वकिली करणार : आ. काशीनाथ दाते

शिक्षकांच्या क्यूआर कोडच्या विषयात चर्चा करण्यासाठी शिक्षणमंत्री व पालकमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक लावण्याचा निर्णय झाला असून या बैठकीला मी स्वतः उपस्थित राहणार राहत शिक्षकांची वकिली करणार आहे. राज्यात सध्या खाजगी शिक्षण संस्थांचे फुटले असून यातून खाजगी आणि सरकारी शिक्षणाच्या दर्जात यात तुलना करण्यात येत आहे. क्यूआर कोडबाबत शिक्षकांच्या मागण्या रास्त असून कदाचित जिल्हा परिषदेत निवडणुका होऊन पदाधिकारी असते तर ही वेळ आली नसती. पदाधिकाऱ्यांशिवाय जिल्हा परिषदेत अधिकाऱ्यांवर अंकुश राहिला नसून जिल्हा परिषदेतील प्रशासकीय राजमधील अन्यायकारक निर्णय थांबवण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

# इतिहासाचे खरे स्वरूप आणण्याचा प्रयत्न चांगला

## मोहनलाल मानधना; विचार भारतीच्या शालेय वक्तृत्व स्पर्धेस प्रतिसाद

अहिल्यानगर | नगर सह्याद्री

वक्तृत्व स्पर्धा ही व्यक्तिमत्त्व फुलवणारी स्पर्धा आहे. शालेय जी-वनात उपयुक्त असलेल्या या स्पर्धेचे दरवर्षी आयोजन करून विचार भारती उत्कृष्ट काम करीत आहे. महापुरुषांच्या नावाने होणाऱ्या या वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून देशात जो इतिहास घडला आहे त्याचे खरे स्वरूप नव्या पिढीपुढे आणण्याचा विचार भारतीचा हा चांगला प्रयत्न आहे, असे प्रतिपादन रामकृष्ण एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त मोहनलाल मानधना यांनी केले.

अहिल्यानगरच्या विचार भारतीच्या वतीने आयोजित स्व. नंदकिशोर नातू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्वातंत्र्यवीर सावरकर वक्तृत्व स्पर्धेच्या अंतिम फेरीचे उद्घाटन मोहन-लाल मानधना यांच्या हस्ते झाले,




त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उद्योजक प्रफुल्ल नातू, विचार भार-तीचे सचिव सुधीर लांडगे, स्पर्धेचे समन्वयक विशारद पेटकर व सु-नील नागोरी आदींसह शहरातील २० शाळांमधून आलेले स्पर्धक, शिक्षक व पालक उपस्थित होते. यावर्षी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावर व कार्यावर प्रकाश टाकणारे विषय स्पर्धेसाठी देण्यात आले होते.

यावेळी सुधीर लांडगे म्हणाले, नव्या पिढीला देशाच्या स्वातंत्र्य संग्रामाची माहिती होणे आवश्यक आहे. ज्यांनी आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले त्यांचे कार्य, शौर्य व त्याग लहान मुलांना माहिती व्ह-ावे, तसेच नव्या पिढीला राष्ट्रहिताचे विचार व जाणीव देण्यासाठी विचार भारती महापुरुषांच्या नाव-ाने वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करत आहे.स्वातंत्र्यवीर सावरकर वक्तृत्व स्पर्धेच्या प्राथमिक व अंतिम फेरीत सर्व स्तरांतील पालक वर्गाने व विविध शाळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दिव्यांग विद्यार्थ्यांनीही या स्पर्धेत सहभाग घेतला. यासाठी रामकृष्ण शाळेचे सहकार्य लाभले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ येत्या २६ फेब्रुवारी रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीदिनी होणार आहे, असे विशारद पेटकर यांनी प्रास्ताविकात सांगितले.

प्रफुल्ल नातू यांनी विचार भारतीच्या उपक्रमांचे कौतुक करून चांगल्या विचाराचा प्रसार करणाऱ्या या स्पर्धेस कायम सहकार्य करू असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक सागडे यांनी केले. स्पर्धेचे परीक्षण चैत्राली जावळे, जया देशपांडे, प्रा. संदीप कांबळे व विवेक वाडेकर यांनी केले. यावेळी विचार भारतीचे सहसचिव महेंद्र जाखोटिया, मनोज झंवर, अंकुश गोळे, डॉ. नीलकंठ ठाकरे, रवींद्र बारस्कर व श्री. भिंगारदिवे आदींनी स्पर्धेचे यशस्वी नियोजन केले.

# महाशिवरात्री निमित्त फुलसौंदर मळ्यात अखंड हरिनाम सप्ताह

अहिल्यानगर | नगर सह्याद्री

महाशिवरात्री उत्सवानिमित्त शिवपंचायतन मंदिर, फुलसौंदर मळा येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले आहे.

महाशिवरात्रीच्या उत्सवाचे हे २६ वे वर्ष असून २० फ ेब्रुवारी २०२५ पासून ते २७ फ ेब्रुवारी २०२५ पर्यंत चालणा-या या सप्ताहामध्ये पहाटे ४ ते ६ काकड आरती, विष्णु सहस्त्रनाम सकाळी ८ ते ९ व सकाळी ९ ते १२ ज्ञानेश्वरी पारायण होणार आहे. सप्ताह काळात रामदास महाराज रक्ताटे, हरिदास महाराज पालवे शास्त्री, मच्छिंद्र महाराज राऊत, बबन महाराज बहिरवाल, पुंडलिक महाराज जंगले शास्त्री ,योगेश महाराज पवार शास्त्री, स्वामी महाराज अमृतानंद सरस्वती, आदींची प्रवचने व जागर होणार आहे. गुरुवार (ता. २७) रोजी सकाळी दहा वाजता महंत बालयोगी अमोल महाराज जाधव यांचे काल्याचे कीर्तन होऊन उत्सवाची सांगता होणार आहे, अशी माहिती माजी प्रथम महापौर भगवान फ ुलसौंदर यांच्या वतीने देण्यात आली. अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचा सर्व परमार्थिक भाविक भक्तांनी लाभ घ्यावा. असे आव्हान विष्णू फुलसौंदर, दिलीप माडगे, राजु फुलसौंदर, भास्कर गायकवाड, अनिल साळुंके, रघुनाथ केदार, गणेश माने, गणेश फुलसौंदर, दिपक फुलसौंदर, अवधुत फुलसौंदर यांनी केले आहे.

# ९ मार्च रोजी नगरमध्ये खासदार मॅरेथॉन

## वाढदिवसाचे औचित्य साधून नीलेश लंके प्रतिष्ठानचा उपक्रम

अहिल्यानगर | नगर सह्याद्री

शेतकरी बांधवांचे हक्क आणि परवडणाऱ्या आरोग्यासाठी जनजागृती करण्यासाठी खासदार नीलेश लंके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरात ९ मार्च रोजी सकाळी ६ वाजता खासदार मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

५ किमी आणि १० किलोमीटर अंतराच्या या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी नोंदणी बंधनकारक आहे. तर २.५ किमी वॉकाथॉनसाठी कोणतीही नोंदणी आवष्यक नसल्याचे सांगण्यात आले.

नगर-कल्याण महामार्गावरील द्वारका लॉन्स येथून मॅरेथॉनला प्रारंभ होणार असून केडगांव बायपास मार्गे पुन्हा द्वारका लॉन्स येथे मॅरेथॉनची सांगता होईल.




५ किमी आणि १० किमीच्या या स्पर्धेत १२ वर्षावरील पुरूष आणि महिला सहभागी होऊ शकतात. याशिवाय महिला व १२ वर्षांखालील मुले आणि ज्येष्ठ नागरीकांसाठी २.५ किमी वॉकथॉनचे आयोजन करण्यात आले आहे.

मॅरेथॉन स्पर्धेबरोबरच शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि सर्वसामान्य नागरीकांसाठी दर्जेदार व परवडणाऱ्या आरोग्य सेवांसाठी ही चळवळ आहे. त्यामुळे अहिल्यानगरमधील नागरीकांनी या सामाजिक उपक्रमात मोठया संख्येने सहभागी होण्याचे आवाहन नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

### रुईछत्रपती फाटा ते पठारे वस्ती रस्त्याचे काम अर्धवट सोडल्याने प्रवाशांना मनस्ताप

# पूर्ण कामानंतरच ठेकेदाराचे पेमेंट करा : पवार

सुपा | नगर सह्याद्री

पारनेर तालुक्यातील रूईछत्रपती फाटा ते पठारे वस्ती रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे केले जात असल्याने हे काम ग्रामस्थांनी दोन वेळा बंद पाडले. बऱ्याच दिवसानंतर संबंधित ठेकेदाराने काम चालू केले मात्र तेही अर्धवट अवस्थेत सोडल्याने ग्रामस्थांसह प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतरच ठेकेदाराचे पेमेंट करावे अशी मागणी पारनेर तालुका दूध संघाचे अध्यक्ष दत्ता नाना पवार यांनी केली आहे.



एक ते दीड वर्षापूर्वी रूईछत्रपती फाटा ते पठारे वस्ती रस्त्याचे काम मंजूर झाले. मात्र ठेकेदाराच्या आडमुठेपणामुळे हे काम उशिरा सुरू करण्यात आले. अवघ्या दोन दिवसांत रस्त्यावर खडी टाकून काम उरकण्याचा ठेकेदाराचा प्रयत्न ग्रामस्थांनी हाणून पाडला. सुरू केलेल्या कामात डांबराचा कमी वापर करणे, पाणी कमी वा-परणे, रोलिंग न करणे आदी तक्रारी ग्रामस्थांच्या लक्षात आल्यानंतर ग्रामस्थांनी तालुका दूध संघाचे अध्यक्ष दत्ता नाना पवार, भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष नितीन पठारे यांना याबाबत कल्पना दिली. पवार व पठारे यांनी तात्काळ रस्त्याच्या कामावर जाऊन कामाची पाहणी केली असता हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे सुरू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तातडीने काम बंद करा अशा सूचना कामगारांना दिल्या.

हे काम बंद झाल्यानंतर १५ दिवसांनंतर ठेकेदाराने काम चालू केले; मात्र तेही अर्धवट अवस्थेत सोडल्याने रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत, तर रस्त्याच्या कडेला टाकलेली खडी रस्त्यावर येऊन मोटारसायकल स्वार घसरून पडण्याच्या घटनांत वाढ झाली आहे.

रुईछत्रपती फाटा ते पठारे वस्ती रस्ता दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा रस्ता आहे. २५ वर्षांपूर्वी या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. हा रस्ता व्हावा ही गेली अनेक वर्षांपासूनची ग्रामस्थांची मागणी होती. रुईछत्रपती येथे ग्रामीण आरोग्य केंद्र असल्याने सुपा परिसरातील नागरिकांना या रस्त्यावरून ये जा करावी लागते. तसेच शेतकऱ्यांनी पिकविलेला शेतमाल मुख्य बाजारपेठ असलेल्या सुपा, पारनेर, नगर, पुणे या ठिकाणी नेण्यासाठी या रस्त्याचा वापर केला जातो. यासह शाळे-तील विद्यार्थी, दूध उत्पादक शेतकरी, सुपा औद्योगिक वसाहतीमधील कामगार यांना रात्री अपरात्री या रस्त्यावरून ये जा करावी लागते. रस्त्यासाठी निधी मंजूर झाला, रस्त्याचे कामही सुरू झाले मात्र ते अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असून तेही अर्धवट अवस्थेत सोडल्याने ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# समर्थ विद्या मंदिरात विद्यार्थ्यांकडून मातृपितृ पूजन



अहिल्यानगर | नगर सह्याद्री

सावेडीच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला प्राथमिक विभागात विद्यार्थ्यांनी मातृपितृ पूजन केले. यावेळी सौ. अनिता गर्भे, सौ.जया म्याना, सौ. वैशाली कुलकर्णी, अभय गर्भे, अरविंद वाबळे, अमित गर्भे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी मुलांनी आपल्या आईवडिलांचे औक्षण व नंतर आईने मुलांचे औक्षण केले. मुलांनी आपल्या आईवडिलांच्या भोवती प्रदक्षिणा मारली. तसेच शेवटी आरती करून वाकून नमस्कार केला व आशीर्वाद घेतला. हे पाहून पालकांच्या डोळयात आनंदाश्रू आले होते. त्यामुळे नकळतपणे काही वेळ सर्व भावनिक झाले होते.अभय गर्भे यांनी मुलांना मातृ पितृ पूजनाचे महत्त्व सांगितले. प्रत्येकाच्या जीवनात आईवडिलांचे महत्त्व अन्ययसाधारण आहे. त्यामुळे आईवडील आपल्याकरिता सतत झटत असतात. त्यांचे पूजन करून आपण आशीर्वाद घेतले पाजेत.धनश्री गुंफेकर म्हणाल्या की, 'उत्कट भव्य तेचि घ्यावे' या उक्तीप्रमाणे समर्थ शाळा नेहमीच उपक्रम राबवीत असते. आज आपण संस्कार विसरत चाललो आहोत. आपल्या संस्कृतीत आईवडील, देवाची पूजा करा हे आहे. पाश्चात्य संस्कृती अनुकरण न करता भारतीय संस्कृती जोपासायची आहे. आईवडिलाचे ऐका, आज्ञा पाळा. हे संस्कार लहान वयात मुलांना माहिती होण्याकरिता हा उपक्रम आम्ही करत आहोत. याकरिता पालकांनी दिलेला सहभाग महत्त्वाचा आहे. पुढची पिढी घडण्याकरिता ते अत्यंत महत्त्वाचे आहे. अश्विनी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

(पान १ वरून)

### थकबाकीदारांवर जप्तीचा बडगा

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेतून रस्त्यांसाठी १५० कोटींचा निधी दिला आहे. यात ४५ कोटी रुपयांचा स्वहिस्सा आहे. त्यापैकी सुमारे १० कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. उर्वरित ३५ कोटी जमा करावे लागणार आहेत. जिल्हास्तर नगरोत्थान योजनेत १९ कोटींचा स्वहिस्सा भरणे बाकी आहे. सोलर प्रकल्प व नाट्य संकुल २ कोटी, फेज टू ५ कोटी तर, अमृत भुयारी गटार योजनेत ३७ कोटींचा स्वहिस्सा भरणे बाकी आहे. वसुली वाढत नसल्याने स्वहिस्सा भरण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. यातून कामे रखडण्याची शक्यता आहे. त्यामुळे थकबाकीदारांवर जप्ती कारवाई अधिक तीव्र करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नागरिकांनी सवलतीचा लाभ घेऊन तत्काळ थकीत कराचा भरणा करावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

### रिक्षाचालकांत राडा

एमएच १६ बीसी ३३१३ या रिक्षाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. रिक्षा चालक मुदस्सर शेख आणि वसंत मोकाटे यांच्यात वाद झाला. घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांना घटनास्थळी दगडांचा साठा व काचेचे तुकडे आढळून आले. वादाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून कोतवाली पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

### व्यावसायिकावर हल्ला

उर्फ डोडो औताडे (पत्ता माहिती नाही) व इतर ४-५ अनोळखी इसम यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी ज्ञानेश्वर हे सम्राट चौकातून जात असताना संशयित आरोपींनी त्यांना अडवले. तु खूप कमी दिवसांत मोठा पैसा कमविला आहे', असे म्हणत संशयित आरोपींनी धारदार शस्त्र, फायटर, लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्याने हल्ला केला. या मारहाणीत फिर्यादी गंभीर जखमी झाले. त्यानंतर संशयित आरोपींनी त्यांचा गळ्यातील चार तोळे सोन्याची चैन आणि रोख नऊ हजार २०० रूपये जबरदस्तीने काढून घेतले.दरम्यान, फिर्यादी सोबत असलेले मित्र बाळू सयाजी साठे आणि साजित पठाण यांना देखील संशयित आरोपींनी मारहाण केली. तसेच, फिर्यादी व त्यांच्या मित्रांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस अंमलदार चौधरी अधिक तपास करत आहेत.

### मुलाचे अपहरण

फिर्यादी नेहमीप्रमाणे भाजीपाला विक्रीसाठी घरापासून काही अंतरावर गेल्या होत्या. त्या वेळी मुलगा घरीच होता. रात्री ८:३० वाजता तो आईकडे आला व काही वेळ थांबून आई, मी घरी जातो, असे सांगून निघून गेला. यानंतर रात्री १० वाजता आई घरी परतली असता मुलगा घरी नव्हता. त्यावर त्यांनी बहिणीला विचारले असता, मुलगा घरी आला होता, सायकल लावली आणि मावशी, मी बाहेर खेळायला जातो असे सांगून बाहेर गेला, असे तिने सांगितले. मात्र, त्यानंतर तो घरी परतलाच नाही. कुटुंबाने तत्काळ परिसरात शोध घेतला, त्याच्या मित्रांकडे आणि नातेवाईकांकडे चौकशी केली, परंतु त्याचा काहीही तपास लागला नाही. अखेर, पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. पोलीस मुलाचा शोध घेत आहेत.

### शिंदे गट भाजपात विलीन होणार

भाजप आणि एकनाथ शिंदे हे भविष्यात एकत्र राहणार नाहीत. एकनाथ शिंदेंचे काम झालेले आहे. त्यामुळे आता एकनाथ शिंदेंचे काम तमाम होणार आहे, हे आता सर्वांना दिसत आहे. हे त्यांनाही माहिती आहे, त्यांच्या लोकांनाही माहिती आहे, असा दावा संजय राऊत यांनी केला आहे.त्यांचा पक्ष हा भाजपमध्ये विलीन होईल किंवा त्या पक्षातील एक मोठा गट हा कोकणातील नेत्याच्या नेतृत्वाखाली भाजपबरोबर जाईल. हे तुम्ही स्टॅम्प पेपरवर लिहून घ्या. मी तुम्हाला सही देतो, असे संजय राऊत म्हणाले.जे कोणी पक्ष सोडतायत ते पदाधिकारी आहेत. पुढल्या दोन दिवसांत आमची बैठक आहे. आम्ही काही जणांना नव्याने जबाबदाऱ्या देणार आहोत. आम्ही खचणारे लोक नाहीत. जाणारे जावू द्या. सत्ता, पैसा दबाव आहे. काहीतरी अडचणी आहेत. जुन्या केसेस काढल्या जातात. काही लोकांची मने कमकुवत झाली आहेत. लढण्याची इच्छाशक्ती नसलेले जात आहेत. मुर्दाड लोकांना ठेवून तर काय करायचे, असा टोला संजय राऊतांनी लगावला.

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED
MY OLD NAME
SHRADHA HITENDER
CHOUDHARI
TO NEW NAME
SHRADHA HITENDER
CHOUDHARY

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED
MY OLD NAME
HITENDER BRIJKISHOR
CHOUDHARI
TO NEW NAME
HITENDER BRIJKISHOR
CHOUDHARY

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED
MY OLD NAME
CHAVI HITENDER
CHOUDHARI
TO NEW NAME
CHAVI HITENDER
CHOUDHARY

**नगर सह्याद्री** हे दैनिक मुद्रक, प्रकाशक व मालक शिर्के शिवाजी अप्पाजी यांनी समाचार प्रेस, ४१८८, मैदान आड, लक्ष्मी कारंजा, अहिल्यानगर- ४१४००१ येथे छापून सह्याद्री पब्लिकेशन, फ्लॅट नं. १०, कुंदननगरी अपार्टमेंट, डॉ. आंबेडकर रोड, माळीवाडा, अहिल्यानगर -४१४००१ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. RNI No.MAHMAR/2013/59865 *संपादक - शिर्के शिवाजी अप्पाजी, मो. ९४२२२२१७६१, निवासी संपादक- चोभे सुनील सुरेश, फोन नं. ०२४१-२३४१७६१,
Email-nagarsahyadri@gmail.com (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे. वादविवाद अहमदनगर न्यायकक्षेत)
**Daily Nagar Sahyadri** Printer, Publisher and Owner by Shirke Shivaji Appaji Printerd at Samachar Press,4188, Maidan aad, Laxmi Karanja, Ahilyanagar-414001 (Maharashtra) And Pubished at **Sahyadri Publication**, Flat No.10, Kundannagari Appartment, Dr. Ambedkar Road, Maliwada, Ahilyanagar-414001 (Maharashtra) ***Editor- Shirke Shivaji Appaji Mob.9422221761,**
**Resi. Editor -Chobhe Sunil Suresh**, Ph. No.0241-2341761 ● Vol-12 ● Issue No.99 ● Prize Rs.3/- ● Pages -4 ● 18/02/2024

## सहकार चळवळीच्या माध्यमातून जी. एस. महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर

# गुलाबराव शेळके, ॲड. उदय शेळके यांचे काम लोकाभिमुख

### माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री आनंदराव अडसूळ । उदय गुलाबराव शेळके फाउंडेशनच्या वतीने जलसेन पुरस्कारांचे वितरण



छाया / दत्ता उनवणे

पारनेर । नगर सह्याद्री

सहकार चळवळीच्या माध्यमातून जी. एस. महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके व माजी अध्यक्ष ॲड उदय शेळके यांचे काम लोकाभिमुख असून मुंबई स्थायिक अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील जनतेसाठी शेळके कुटुंबाचे सर्वाधिक योगदान असल्याचे प्रतिपादन माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री आनंदराव अडसूळ यांनी केले.

उदय गुलाबराव शेळके फाउंडेशनच्या वतीने जलसेन पुरस्कार २०२५ चे वितरण माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री आनंदराव आडसूळ, खासदार नीलेश लंके, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू पाटील, माजी आमदार सुधीर तांबे, माजी आमदार अशोकराव धात्रक, माजी आमदार अशोकराव पवार, जी. एस. महानगर बँकेच्या अध्यक्षा सुमनताई शेळके, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, माजी संचालक सी. बा आडसुळ, लक्ष्मण गाजरे, फाउंडेशनच्या अध्यक्षा व जिल्हा सहकारी बँक व जी. एस. महानगर बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार नीलेश लंके होते. यावेळी फाउंडेशनच्या अध्यक्षा गीतांजली शेळके यांनी प्रास्ताविकात फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. यावेळी जी. एस. महानगर बँकेचे माजी संचालक सी. बा. आडसुळ, लक्ष्मण गाजरे, मुंबई महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, जी. एस. महानगर बँकेच्या संचालिका स्मिता पाटील आदींची भाषणे झाली. यावेळी उदय गुलाबराव शेळके शैक्षणिक पुरस्कार देखील देण्यात आले. त्याच बरोबर उदय गुलाबराव शेळके जलसेन पुरस्कार ११ हजार रुपये रक्कम आणि पुरस्कार चिन्ह देऊन तालुक्यातील गावांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम घोलप यांनी केले. शेवटी बाजार समितीचे संचालक डॉ. आबासाहेब खोडदे व सुभाष खणकर यांनी आभार मानले.

**पुरस्कारांच्या माध्यमातून गावांना प्रोत्साहन : अशोक पवार**

सॉलिसीटर गुलाबराव शेळके व उदय शेळके यांनी राज्यातील औद्योगिक विकासासाठी जी. एस. महानगर बँकेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. पाणी फाढंडेशनच्या माध्यमातून गीतांजली शेळके यांनी सर्वसामान्य शेतकरी व जनतेच्या हितासाठी मोठे काम केले असून तालुक्यातील गावांना उदयदादा गुलाबराव शेळके जलसेन पुरस्कार देऊन प्रत्येक गावाने जलसंधारणाचे काम करावे यासाठी पुरस्कार माध्यमातून प्रोत्साहन दिले आहे असल्याचे मत माजी आमदार अशोकराव पवार यांनी व्यक्त केले.

**शेळके यांचा सहकार चळवळीत राज्याला आदर्श : अशोकराव धात्रक**

जी. एस. महानगर बँकेचा गौरवशाली इतिहास सर्वांना ज्ञात आहे. सॉ. गुलाबराव शेळके व उदय शेळके यांनी सहकार चळवळीत काम करताना राज्याला आदर्श घालून दिला आहे. शैक्षणिक क्षेत्रात काम करताना संजीवनी प्रतिष्ठान संस्थेच्या माध्यमातून ॲड. उदय शेळके यांनी व्यवसायीक शिक्षण देत पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यातील शेकडो कुटुंबाना स्थिरस्थावर केले असल्याचे माजी आमदार अशोकराव धात्रक यांनी सांगितले.

**पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून राज्यात आदर्शवत काम : माजी आमदार सुधीर तांबे**

थोरात कुटुंबाचा राजकीय व सामाजिक वारसा घेऊन गीतांजली शेळके यांनी शेळके कुटुंबात कार्यरत राहून सामाजिक, शैक्षणिक उपक्रम सुरु ठेवीत पाणी फौंडेशनच्या माध्यमातून राज्यात आदर्शवत काम केले आहे. आजोबा भाऊसाहेब थोरात यांचा सामाजिक वारसा जोपासण्यासाठी परिश्रम घेत सॉलिसिटर गुलाबराव शेळके व ॲड.उदय शेळके यांचे कार्य पुढे नेण्यासाठी सर्वांना बरोबर घेऊन काम करीत आहेत ही तालुक्यातील जनतेच्या दृष्टीने भुषनास्पद बाब आहे, असे मत माजी आमदार सुधीर तांबे यांनी व्यक्त केले.

**जलसेन पुरस्काराने तालुक्याचा नावलौकिक राज्यात झाला : खासदार नीलेश लंके**

सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब व ॲड. उदयदादा शेळके यांनी बँकेच्या माध्यमातून राज्यातील जनतेला मोठ्या प्रमाणात आर्थिक पाठबळ दिले आहे. शेळके कुटुंबाने सामाजिक, शैक्षणिक, सहकार चळवळीत काम करताना पिंपरी जलसेन येथे पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून गाव व परिसर सुजलाम सुफलाम करण्यासाठी प्रयत्न केले असून राज्यस्तरीय पुरस्काराने तालुक्याचा नावलौकिक राज्यात झाला आहे. यासाठी फाउंडेशनच्या अध्यक्षा गीतांजलीताई शेळके यांनी व गावकऱ्यांनी मोठे परिश्रम घेतले असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले.

---

## 'विजयाराजे' कन्या विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात



श्रीगोंदा । नगर सह्याद्री

येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व एस एस सी विद्यार्थिनींचा शुभचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकांत चौधरी होते. यावेळी कुंडलिक दरेकर, नवनाथ बोडखे, तुकाराम कन्हेरकर, उपनगराध्यक्षा ज्योती खेडकर, प्रा. दिलीप भुजबळ, ज्योती वायभासे, दत्तात्रय जगताप, जयश्री दरेकर, रत्नप्रभा बोरुडे, पत्रकार पीटर रणशिंग, भीमराव आनंदकर, बापूराव औटी, पांडुरंग जगदाळे, वसंतराव दरेकर, सचिन झगडे, परशराम लांडगे आदींसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापिका गीता चौधरी यांनी प्रास्ताविक केले. उपमुख्याध्यापिका नीलिमा कातोरे यांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. तसेच मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विधार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. सुनिता काकडे, शहाजी एकाड यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विभागप्रमुख विकास चव्हाण, गीतांजली राऊत यांनी परिश्रम घेतले. सारिका दिवटे यांनी सूत्रसंचालन केले. किरण शिंदे यांनी आभार मानले.

## ग्रामशेतरस्ता समिती स्थापनेचा अहवाल द्या

### शीवपाणंद शेतरस्ता समितीची मागणी

सुपा । नगर सह्याद्री

पारनेर तालुक्यातील ग्राम शेतरस्ता समिती स्थापनेच्या निवेदनाचा अनुपाल अहवाल देण्याची मागणी शीवपाणंद शेत रस्ता समितीने केली आहे.

ग्रामसेवकांवर दप्तर दिरंगाई शिस्तभंगाची कठोर कारवाईबाबत महाराष्ट्र राज्य शीवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने पंचायत समिती कार्यालयात निवेदन देण्यात आले होते. शासन निर्णयांमध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायत स्तरावर आराखडा ग्रामविकास अधिकारी यांनी कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे व त्यासाठी प्रत्येक गावामध्ये ग्रामशेत रस्ता समिती स्थापन करून पंचायत समिती पारनेर कडून रस्त्याबाबतचा सातत्याने ग्राम विकास अधिकारी यांकडून अनुपालन अहवाल घेणे गरजेचे आहे. सदर ग्रामसेवक रस्ता समिती अजून कुठल्याच गावांमध्ये कार्यान्वित नसल्याचे दिसून येत आहे. पारनेर तालुक्यातील ग्रामसेवक यांनी शेतरस्ता समिती स्थापन करण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्यास, कर्तव्य पालनातील कसूर केलेले असल्यास त्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तालुका शीवपाणंद शेतरस्ता चळवळीचे सचिन शेळके, भाऊसाहेब वाळूंज, दशरथ वाळूंज, संजय साबळे, स्वप्निल गट, सचिन भागवत, नवनाथ घुले, नवजोत पवार, गणेश कोठावळे आदींनी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी एस एस जगताप यांच्याकडे केली आहे.



## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर बलात्कार

पारनेर । नगर सह्याद्री

लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर बलात्कार करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी ३१ वर्षीय तरुणीच्या फिर्यादीवरून शुभम वगडू नरसाळे (रा. गोरेगांव ता. पारनेर) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


१५ ऑगस्ट २०२३ रोजी रात्री १२ ते २७ जानेवारी २०२५ पर्यंत आरोपी शुभम याने संबंधित तरुणीवर लग्नाचे अमिष दाखवून गोरेगांव ता. पारनेर, वाघुंडे, ता. पारनेर, शिक्रापूर ता. शिरूर येथे वेळोवेळी अत्याचार केले.

तू माझ्यासोबत लग्न का करत नाहीस असे पिडीतेने त्यास विचारले असता मला तुझ्या सोबत लग्न करायचे नाही असे सांगत शिविगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. तु गोरेगांव येथे घरी आलीस तर तुला मारून टाकेन अशी धमकी शुभम याने दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान आरोपी शुभम हा फरार असून तपासी अधिकारी तथा पोलीस उपनिरीक्षक रणजीत मारग हे त्याचा शोध घेत आहेत.

---

## ढवळगाव येथील खंडेश्वर देवाची यात्रा उत्साहात



श्रीगोंदा । नगर सह्याद्री

श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव येथील खंडेश्वर देवाची यात्रा मोठ्या उत्साहात पार पडली. जेजुरी गडावरून आणलेल्या ज्योतीची मिरवणूक काढण्यात आली. मानाचे गाडे ओढण्याचा कार्यक्रम पार पडला. देवाचा छबिना, पूजा, आरती करून पारंपरिक पद्धतीने यात्रा पार पडली. यात्रेच्या दिवशी कै. तुकाराम खेडकर सह पांडुरंगमुळे यांचा लोकनाट्य तमाशा, तसेच दुसऱ्या दिवशी निकाली कुस्त्यांचा जंगी आखाडा आयोजित करण्यात आला होता. आखाड्यात नामवंत पहिलवानांनी हजेरी लावली होती. लावण्यचंद्रा निर्मिती शाहीर शैलेश लोखंडे यांचा समाज प्रबोधन सदाबहार ऑर्केस्ट्रा पार पडला. यावेळी शाहीर लोखंडेंनी स्त्री भ्रूण हत्या थांबवण्याचा संदेश कार्यक्रम मधून दिला.

## पारमार्थिक सेवेची खऱ्या अर्थाने गरज : डॉ. जाधव महाराज

### संत श्री गोरोबा काका अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

निघोज । नगर सह्याद्री

पनरमार्थिक सेवा करीत माणुसकी जपण्याचे काम केल्यास ईश्वरी सेवा आपोआप होते. यासाठी आजच्या युगात पारमार्थिक सेवा करण्याची खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. नारायण महाराज जाधव यांनी केले. निघोज येथील संत श्री गोरोबा काका अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने करण्यात आली. त्यावेळी डॉ. जाधव महाराज हे कीर्तनातून मार्गदर्शन करताना बोलत होते. कुंभार समाज व पंचक्रोशीतील भावीकांनी धार्मिक संस्कृती वाढविण्यासाठी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. ज्येष्ठांसहीत युकक मंडळी तसेच महिला भगीनी यांचा महत्वपूर्ण सहभाग या अखंड हरिनाम सप्ताहात आहे. लोकसहभागातून ग्रामस्थ यासाठी उदार हस्ते मदत करतात हे परमभाग्य गावकऱ्यांना लाभले आहे. माणूसकीचा धर्म आणि परमार्थ हा प्रत्येकाच्या अंगी असण्याची गरज आहे. आपण येताना मोकळे आणि जाताना मोकळेच, माणुसकी आणि परमार्थ ही ईश्वरी सेवा आहे. हेच आपल्या बरोबर येत असल्याने पैशापेक्षा नामजप महत्वाचा असल्याचे डॉ. जाधव महाराज यांनी सांगितले.

अखंड हरिनाम सप्ताहात कैलास महाराज येवले, गणेश महाराज जगताप, बाळकृष्ण महाराज डांगे, पंडित महाराज क्षीरसागर, चिदंबरेश्वर महाराज साखरे, भागवत महाराज साळुंके, संदीपन महाराज शिंदे, वारकरी संप्रदायाचे भूषण वेदांतचार्य डॉ. नारायण महाराज आदी राज्यांतील नामवंत कीर्तनकारांनी कीर्तनरुपी सेवा दिली आहे. प्रत्येक दिवशी महाप्रसादाचे आयोजन, हरिपाठ भजन अशाप्रकारे अतिशय चांगल्या प्रकारचे नियोजन करीत श्री संत गोरोबा काका अखंड हरिनाम सप्ताह मंडळ व ग्रामस्थ यांनी गाकऱ्यांना नामवंत कीर्तनकारांचे मार्गदर्शन देण्याचे काम केले आहे.



## अभिजीत आहेर यांचा सत्कार



श्रीगोंदा । नगर सह्याद्री

अभिजीत आहेर यांचा केंद्रीय गृहखाते अंतर्गत गुप्तचर विभागात अधिकारी पदावर निवड झाल्याबद्दल मळगंगा कंस्ट्रक्शन व निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेच्या वतीने अमृता रसाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रा. डॉ. सहदेव आहेर, निघोज पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद, मळगंगा ट्रस्टचे कार्याध्यक्ष रामदास वरखडे, सचिव शांताराम कळसकर, वसंत वांढेकर, ॲड. रामदास घावटे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. रसाळ म्हणाले, डॉ. आहेर यांच्यासारखे गुणवंत शिक्षक असल्यामुळे मोठ्या संख्येने भागातील विद्यार्थ्यांना उच्च अधिकारी होण्याची संधी मिळाली. अभिजीत आहेर यांच्या सारख्या शेकडो विद्यार्थ्यांनी संधीचे सोने करुन विविध विभागात अधिकारी झाले असून अहिल्यानगर जिल्ह्याचा देशात नावलौकिक झाला असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. यावेळी अनेक मान्यवरांची भाषणे झाली. उपप्राचार्य डॉ मनोहर एरंडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्राध्यापिका गाडीलकर यांनी आभार मानले.

---

## श्रीगोंदा तालुक्यात गहू, कांदा पीक जोमात

### पिकाला उन्हाचे चटके, शेतकऱ्याला लाईटचे झटके

श्रीगोंदा । नगर सह्याद्री

श्रीगोंदा तालुक्यामध्ये यावर्षी रब्बी हंगामासाठी २७६६३ हेक्टर क्षेत्रामध्ये विविध धान्यांचा पेरा झाला असून अन्य पिकांसह गहू व कांदा पिकाची परिस्थिती उत्तम असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी शशिकांत गांगर्डे यांनी नगर सह्याद्रीशी बोलताना दिली.

श्रीगोंदा तालुक्यातील २७६६३ हेक्टर क्षेत्रापैकी १२३१२ हेक्टर क्षेत्रावर ज्वारी, ११५८७ हेक्टर क्षेत्रावर गहू,३७६४ हेक्टर क्षेत्रावर मका असा पेरा तृणधान्यांचा झाला आहे. तसेच १६९४२ हेक्टर क्षेत्रावर कांदा लागवड असा पेरा रब्बी हंगामामध्ये श्रीगोंदा तालुक्यात होतो. श्रीगोंदा तालुका हा रब्बी हंगामाचा तालुका म्हणून ओळखला जातो. अलीकडच्या काळामध्ये पारंपारिक मका पिकाचे क्षेत्र घटले असून गव्हाचे क्षेत्र वाढण्याऐवजी कांदा पिकाला शेतकऱ्यांनी अधिक पसंती दिली असल्याची माहिती शशिकांत गांगर्डे यांनी दिली. यावर्षी तालुक्यात रब्बी हंगामाच्या सुरुवातीला पेरा केलेल्या गव्हाच्या पिकाची परिस्थिती सध्या हे पीक हुरड्यात असून चांगले उत्पादन निघण्याचे अपेक्षा कृषी विभागासह शेतकऱ्यांनी ही व्यक्त केली आहे. विविध पिकांची लागवड करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढलेला दिसून येतोय. डाळिंब, द्राक्ष, पपई आदी फळबागांसह सर्वच पिकांना श्रीगोंदा तालुक्यामध्ये अनुकूल आणि पोषक वातावरण असल्यामुळे शेतकरी विविध पिके घेऊ लागलेले आहेत. यावर्षी गव्हाच्या पिकाचा पेरा ही समाधानकारक असून मागील काळात गहू पिकास पोषक वातावरण निर्माण झाल्याने कांदा व गव्हाचे पीक जोमदार आलेले दिसत आहे.



**विजेअभावी शेतकऱ्यांची कसरत**

यंदा पाऊस चांगला झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात रब्बी हंगामात गहू, मका, कांदा, उसाची लागवड केली. मात्र वेळेवर वीज मिळत नसल्याने शेतकरी संकटात सापडला असल्याचं चित्र श्रीगोंदा तालुक्यातील घुगलवडगाव येथे पाहायला मिळत आहे. विहिरींना पाणी देखील उपलब्ध आहे. मात्र वीज वीजपुरवठा सुरळीत नसल्यामुळे शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे.

## बालविवाह प्रकरणात १५० जणांवर गुन्हा दाखल

### जयश्री घावटे यांचा सातत्याने पाठपुरावा

पारनेर । नगर सह्याद्री

महाराष्ट्रात बालविवाह रोखण्यासाठी कठोर कायदे असतानाही सक्षम यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला न्याय मिळवण्यासाठी तीन महिने संघर्ष करावा लागला. अखेर सातत्याने प्रयत्न केल्यानंतर १५० जणांवर गुन्हा दाखल करून संपूर्ण वऱ्हाड तुरुंगात पाठवण्यात आले आहे.

सविस्तर माहिती अशी की, महिला सुरक्षा संघटनेच्या राष्ट्रीय निरीक्षक जयश्री भरत घावटे (ठुबे) यांना बालविवाहाची होत असल्याची माहिती मिळाली होती, त्यानुसार त्यांनी चाइल्ड हेल्पलाइनवर संपर्क साधला. मात्र विवाहाचे ठिकाण माहीत नसल्याने लग्न थांबवणे अशक्य झाले. विवाहपार पडल्यानंतर नागरिकांनी जयश्री ठुबे यांना फोटो पाठवले. दरम्यान १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला पैठण तालुक्यातील एका गावी हलवण्यात आल्याची माहिती उजेडात आली. त्यानंतर स्नेहालयसंस्थेच्या उडान प्रकल्प व्यवस्थापक प्रविण कदम यांच्या पाठपुराव्यामुळे पोलिसांनी अल्पवयीन मुलीला ताब्यात घेतले.

बालविवाह रोखण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा. कुठेही बालविवाह होत असल्याचे आढळल्यास तातडीने चाइल्ड हेल्पलाईन १०९८, उडान बालविवाह प्रतिबंधक प्रकल्प हेल्पलाईन ९०११०२६ ४९५ वावर संपर्क करावा, असे अवहान जयश्री ठुबे यांनी केले आहे. याप्रकरणी बालविवाह प्रतिबंधक अधिकारी राहुल समाधान चराटे यांच्या फिर्यादीनुसार गंगापूर पोलीस ठाण्यात १५० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सदर कारवाईसाठी उडान प्रकल्प व्यवस्थापक प्रविण कदम, जयश्री घावटे, सोशल वर्कर पूजा दहातोंडे, गंगापूर पोलीस, यांनी महत्वाची भूमिका बजावली.






## 'छावा'ची बॉक्स ऑफिसवर डरकाळी! तीन दिवसांतच १०० कोटींचा टप्पा पार

मुंबई : बॉलिवूड अभिनेता विकी कौशलचा 'छावा' चित्रपट सध्या बॉक्स ऑफिस गाजवत आहे. फक्त तीन दिवसांत चित्रपटाने धुमाकूळ घातला आहे. 'छावा' चित्रपट १४ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. प्रेक्षकांकडून चित्रपटाला तुफान प्रतिसाद मिळत आहे. 'छावा' चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत अभिनेता विकी कौशल आणि महाराणी येसूबाईंची भूमिकेत रश्मिका मंदाना पाहायला मिळत आहेत. 'छावा' चित्रपटाने रिलीजच्या तीन दिवसांतच उंच भरारी घेतली आहे. 'छावा' चित्रपटाने तब्बल १०० कोटींचा टप्पा पार केला आहे. या चित्रपटाला सर्वत्र भरभरून प्रतिसाद मिळत आहे. पहिला दिवस - ३३.१ कोटी रुपये, दुसरा दिवस - ३९.३ कोटी रुपये, तिसरा दिवस - ४८.५ कोटी रुपये, एकूण - ११६.५ कोटी रुपये. भविष्यात 'छावा' चित्रपट अजून बंपर कमाई करून अनेक मोठ्या चित्रपटांचे रेकॉर्ड मोडणार असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. चित्रपटातील विकी कौशलच्या दमदार अभिनयाने चाहत्यांना भुरळ घातली आहे. 'छावा' चित्रपट लक्ष्मण उतेकर यांनी दिग्दर्शित केला आहे. हा चित्रपट तब्बल १३० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवला आहे. लवकरच चित्रपटाचे बजेट आता पूर्ण होणार आहे. 'छावा' चित्रपटातून दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा दाखवली आहे. 'छावा' चित्रपटात औरंगजेबाच्या भूमिकेत अक्षय खन्ना पाहायला मिळत आहे. 'छावा' चित्रपटाचे ॲडव्हान्स बुकिंगमध्येच छप्परफाड कमाई केली होती. विकी कौशल, रश्मिका मंदाना आणि लक्ष्मण उतेकर यांनी चित्रपटाचे तगडे प्रमोशन केले होते. 'छावा' चित्रपटात अनेक मराठी कलाकार पाहायला मिळत आहे.

# मनपावर हिंदू धर्मविचाराची सत्ता बसविणार : आ. जगताप

## आ. जगताप यांच्या हस्ते प्रेमदान हडको येथे दक्षिणमुखी हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार व सभामंडप उभारणी कामाचे भूमिपूजन

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



केंद्र व राज्यामध्ये हिंदू धर्माचे संरक्षण करणारी सत्ता आहे आता पुढील काळात होणाऱ्या निवडणुकीमध्ये अहिल्यानगर महानगरपालिकेवर देखील हिंदू धर्म विचाराची सत्ता बसवणार आहे. शहर विकासाच्या योजनांबरोबरच आध्यात्मिकतेचा वारसा अखंडितपणे पुढे घेऊन जाण्याचे काम आपल्या सर्वांना करावे लागणार आहे. मंदिर उभे राहत असताना लोक वर्गणीची खरी गरज असून धार्मिकतेबाबत आत्मीयता निर्माण होत असते. दक्षिण मुखी हनुमान मंदिर हे प्रेमदान हडको मधील नागरिकांचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे या ठिकाणी धार्मिकतेचे वातावरण निर्माण झाले असल्यामुळे सुसंस्कृत पिढी निर्माण होईल. अयोध्या येथे श्री प्रभू राम मंदिराच्या उभारणीमध्ये प्रत्येक नागरिकाने भाग घेतला आहे. तसेच प्रेमदान हडको मधील नागरिकांनी देखील पुढाकार घेत दक्षिणमुखी हनुमान मंदिर उभारणीचे काम हाती घेतले आहे. चुकीच्या गोष्टी सहन करणार नसून जिधर आयेंगा आली उधर आयेंगा बजरंग बली अशी घोषणा आमदार संग्राम जगताप यांनी दिली.

प्रेमदान हडको येथे दक्षिणमुखी हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार व सभामंडप उभारणी कामाचे भूमिपूजन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी नगरसेवक सतीश शिंदे, करण कराळे, अंजली आव्हाड, विलास शिंदे, मयूर कुलथे, सागर मुर्तडकर, सचिन जगताप, शिवजीत डोके, आप्पा खताडे, किशन गायकवाड, मयूर बांगरे, अमित खामकर, प्रसाद डोके, शुभम भगत, सागर शहाणे, सचिन तुपे, राज मुंडलिक, राहुल राऊत, अभिजीत शिंदे, संतोष शिंदे, प्रसाद कुलकर्णी, मंगेश खिळे, संदीप थोरात, प्रथमेश ढेरे, हर्षल भिजय, बाळू खताळे, तात्या सेंदर आदी उपस्थित होते.

विलास शिंदे म्हणाले की प्रेमदान हडको येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिर हे ५० वर्षे पूर्वीचे असून ते भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिराचा जीर्णोद्धार व सभा मंडपाचे काम लोकवर्गणीतून होणार असून त्या कामाची भूमिपूजन आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले. या भागातील नागरिक एकत्र येत वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करत असतात हनुमान जयंती पर्यंत हे मंदिर उभे करण्याचा आमचा मानस आहे असे ते म्हणाले.

# शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन शोधून फौजदारी कारवाई सुरू करणार

अहिल्यानगर । नगर सह्याद्री

शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन शोधण्याची मोहीम महानगरपालिकेने हाती घेतली आहे. विविध भागातील अनधिकृत नळ कनेक्शन शोधून संबंधितांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई केली जाणार आहे. गोविंदपुरा परिसरात अनधिकृत नळ कनेक्शन घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागरिकांनी त्यांचे नळ कनेक्शन अनधिकृत असल्यास ते तत्काळ अधिकृत करून घ्यावे, अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.


गोविंदपुरा परिसरात नवीन बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी घरासमोर महानगरपालिकेची परवानगी न घेता रस्ता फोडून अनधिकृत नळ कनेक्शन घेण्याचा प्रयत्न एका मालमत्ताधारकाने केला. त्यासाठी १५ फूट लांब रस्ता खोदण्यात आला. प्रभाग अधिकाऱ्यांच्या लक्षात ही बाब येताच त्यांनी कठोर कारवाई करत पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. भा प्रकार गंभीर असून महानगरपालिकेची फसवणूक व नुकसान करणारा आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत संपूर्ण शहरात अशा प्रकारे अनधिकृत नळ कनेक्शन घेणाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

शहरात ज्या मालमत्ताधारकांकडे अनधिकृत नळ कनेक्शन आहेत, त्यांनी ते अधिकृत करून घ्यावेत. अनधिकृत नळ कनेक्शन शोधून त्यांच्यावर दंडात्मक व फौजदारी कारवाई केली जाणार आहे. ती टाळण्यासाठी नळ कनेक्शन तत्काळ अधिकृत करून घ्यावे, त्यासाठी प्रभाग समिती कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक डांगे यांनी केले आहे.

# कॉपीमुक्त परीक्षा अभियानाला साथ द्या : धामणे

## गाडे शिक्षण संस्थेत पारितोषिक वितरण व दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



शिक्षकांनी मोठ्या मेहनतीने तुमच्या पंखात बळ भरले आहे. त्या संधीचे सोने करून स्वःताला सिद्ध करा. कॉपीमुक्त अभियानाला साथ देऊन यशाचे शिखर गाठा असे प्रतिपादन जेष्ठ उद्योजक प्रतापराव धामणे यांनी केले.

फकिरवाडा (मुकुंदनगर) येथील यशवंतराव गाडे शिक्षण संस्थेच्या यशवंत माध्यमिक विद्यालय व श्री गणेश बालकमंदिरच्या वतीने वार्षिक पारितोषिक वितरण व दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम पार पडला. यावेळी अध्यक्षपदावरून धामणे बोलत होते. कार्यक्रमास जेष्ठ उद्योजक सुर्यकांत गाडे , संस्थेचे विश्वस्त ज्ञानदेव पाडुंळे, रामचंद्र दिघे, आसाराम म्हस्के, नगरसेवक अमोल गाडे, योगिराज गाडे, पावन गणपती संस्थानचे अध्यक्ष दिलीप गाडे आदि यावेळी उपस्थीत होते.

यावेळी विविध स्पर्धे तील विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले. गुणवंत शिक्षकांचाही गौरव करण्यात आला. दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला भेटवस्तू दिली. स्वागत आदिनाथ लवांडे यांनी केले. मुख्याध्यापिका संगीता बनकर यांनी प्रास्तावीक व अहवाल वाचन केले. मनिषा मगर यांनी सुत्रसंचालन तर सुरेखा कराळे यांनी आभार मानले. यावेळी दहावीच्या मुलांनी मनोगत व्यक्त केले.

# सावेडी ग्रामस्थांच्या वतीने 'छावा'चे जल्लोषात स्वागत



अहिल्यानगर । नगर सह्याद्री

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित छावा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रमाचा इतिहास व जीवन चरित्राचे दर्शन घडविण्यात आले आहे. तरुणांना छत्रपती संभाजी महाराजांचा प्रेरणादायी खरा इतिहास समजावा. छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास या पिढीसमोर यावा.यासाठी सावेडी ग्रामस्थांच्या वतीने छावा चित्रपटाचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.

अश्वारूढ छत्रपती संभाजी महाराज,भालदार चोपदार, मावळे, भगवे झेंडे, पारंपरिक तुतारी व संबळ वाद्यांचा निनादात सावेडी गावातील तरुणांनी भगवा पंचा परिधान करून छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराजांचा विजय असो अशा घोषणा देत, सावेडी गावातून मोठ्या थाटामाटात छत्रपती संभाजी महाराजांची मिरवणूक काढली. यानंतर मिरवणूक कोहिनूर मॉल येथे आल्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांचे औक्षण करून फुलांची उधळण करण्यात आली. छावा चित्रपट बघण्यासाठी मोठ्या संख्येने तरुण सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा अमोल बारस्कर यांनी केली होती.

छावा चित्रपट पाहिल्याच दिवशी प्रदर्शित झाला आहे. चित्रपटातील छत्रपती संभाजी महाराज यांचा पराक्रमाचा इतिहास पाहून प्रेक्षक भारावून गेले. छावा चित्रपट शासनाने टॅक्स फ्री करावा. तसेच शालेय विद्यार्थ्यांना हा चित्रपट मोफत दाखविण्यात यावा, अशी मागणी सावेडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

# यश मिळेपर्यंत मेहनत आवश्यक : डॉ. प्रमोद सावंत

## आयएमएसच्या एमबीए विद्यार्थ्यांचा शैक्षणिक सहली दरम्यान संवाद



अहिल्यानगर । नगर सह्याद्री

कोणत्याही परिस्थितीत यश मिळे पर्यंत मेहनत केली पाहिजे. यश आज नाही तर उद्या नक्की मिळेल असा सल्ला गोव्याचे मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी आयएमएस एमबीए च्या विद्यार्थांना दिला.

आयएमएसच्या विद्यार्थांची शैक्षणिक सहल गोवा येथे नेण्यात आली होती. यावेळी गोव्यातील गोवा सहकारी दुध प्रक्रिया संस्था या कंपनीला भेट दिली. दरम्यान मुख्यमंत्री सावंत यांनी देखील विद्यार्थ्यांशी पणजी येथील मंत्रालयात संवाद साधला. यावेळी प्रा. विजय शिंदे, प्रा. सुरेश खन्ना, कु. कृष्णा थोरे, विजय पाटोळे व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. शिंदे यांनी संस्थेच्या वतीने डॉ सावंत यांचे स्वागत केले. डॉ. सावंत यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना त्यांच्या आयुष्यातील शिक्षणाचा प्रवास व महत्व सांगितले. पुढे ते म्हणाले कि यशासाठी कोणताही मंत्र नाही फक्त मेहनत हीच एक गोष्ट कायम आहे. काम आणि वैयक्तिक आयुष्य यांचा मेळ कसा घालावा यावर देखील त्यांनी भाष्य केले. मंत्रालयात झालेल्या या भेटीत विद्यार्थ्यांसाठी चहा पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मंत्रालयात झालेल्या आदरातिथ्याने व मुख्यमंत्र्यांच्या या भेटीने विद्यार्थी भारावून गेले.

यानंतर विद्यार्थांनी गोवा सहकारी दुध प्रक्रिया या कंपनीला भेट देऊन तेथील व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या गोष्टींची पाहणी केली. तेथील अधिकारी संजय शहाणे व संशील यांनी विद्यार्थांना एकूण प्रक्रियेची माहिती दिली. संपूर्ण कंपनी फिरून त्यातील एकूण एक गोष्टीची, विविध उत्पादने व त्याची गुणवत्ता याची विद्यार्थ्यांनी पाहणी केली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल. शिवाय कॉर्पोरेट क्षेत्रातील आव्हाने व संधी याची देखील माहिती मिळाली.

मुख्यमंत्री भेट मिळवण्यासाठी संस्थेला डॉ. नितीन भोसले व डॉ प्रशांत महांडूळे यांचे विशेष सहकार्य लाभले. या सहलीचा अधिकांश खर्च हा आयएमएस संस्थेने केला. हि सहल यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संचालक डॉ एम बी मेहता, उपसंचालक डॉ विक्रम बार्नबस, विभाग प्रमुख डॉ प्रोनोती तेलोरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा विजय शिंदे यांनी ढ्रीश डशर्ळीीशी कंपनीचे अमित यांच्या सहकार्याने नियोजन केले.

# क्रेडाईच्या अध्यक्षपदी प्रफुल्ल तावरे, सचिवपदी आशिष पोखरणा

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



श्री. प्रफुल्ल तावरे
अध्यक्ष

श्री. आशिष पोखरणा
सचिव

बांधकाम व्यावसायिकांची राज्यस्तरीय शिखर संघटना असलेल्या क्रेडाईच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी बारामती येथील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक प्रफुल्ल तावरे यांची तसेच अहिल्यानगरचे आशिष पोखरणा यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे.

नूतन कार्यकारी मंडळाची निवड २०२५-२०२७ याा कालावधीसाठी, पुणे येथे गेल्या ०७ फेब्रुवारी रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत करण्यात आली. श्री. तावरे व श्री. पोखरणा हे अनेक वर्षे क्रेडाई महाराष्ट्र व क्रेडाई बारामती या संस्थांशी जोडले गेलेले आहेत. त्यांनी आजवर शहर व राज्य पातळीवर अनेक पदे भूषविली आहेत.

याशिवाय सुनील कोतवाल (नाशिक), अनिश शाह (जळगाव), दिनेश ढगे (अकोला), आदित्य जावडेकर (पुणे), विद्यानंद बेडेकर (कोल्हापुर), शशिकांत जिद्दीमनी (सोलापूर) व जयंत ठक्कर (सातारा) यांची उपाध्यक्षपदी तर सुरेंद्र भोइटे यांच्यावर खजिनदारपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. माजी अध्यक्ष समितीचे चेअरमन सतीश मगर, छाननी समितीचे अनंत राजेगावकर व राजीव पारीख तसेच मावळते अध्यक्ष प्रमोद खैरनार यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन केले व पुढील काळासाठी शुभेच्छा दिल्या. नवनियुक्त कार्यकारी मंडळाचे व नवनिर्वाचित अध्यक्षांचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. बांधकाम व्यावसायिकांच्या समस्या सोडविण्यावर येणाऱ्या काळात विशेष प्रयत्न करण्यात येतील अशी माहिती प्रफुल्ल तावरे यांनी दिली.

# 'अहिल्यानगर' नाव सर्वत्र लागू करण्याची मागणी

## आमदार संग्राम जगताप यांना केशरी प्रतिष्ठानचे निवेदन; नेहरू मार्केटची पुनर्बांधणी करावी

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



येथील केशरी प्रतिष्ठानच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांना अहमदनगरचे अहिल्यानगर नामांतर सर्वत्र लागू करण्याबाबत व नेहरू मार्केट पुनर्बाधणीसाठी मागणी करणारे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे कि अहिल्यानगर शहराचे नामकरण अधिकृतपणे झाले असून, केंद्र व राज्य सरकारकडून त्यास मान्यता मिळाली आहे. मात्र, शहरातील अनेक शासकीय कार्यालये व प्रमुख ठिकाणी अद्यापही अहमदनगर हे जुने नावच वापरण्यात येत आहे. त्यामुळे पुढील सार्वजनिक ठिकाणी त्वरित अहिल्यानगरहे अधिकृत नाव लागू करण्यात यावे

येथील रेल्वे स्थानक अद्यापही अहमदनगर या नावाने ओळखले जाते, जिल्हा आयुष्य रुग्णालय (तारकपूर रोड) पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन झालेले असूनही नाव बदलले गेले नाही. इतर सर्व शासकीय कार्यालये, आस्थापना व सूचना फलक येथे देखील नव्या नावाचा त्वरित वापर करावा, असे केशरी प्रतिष्ठानने आमदार जगताप यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

शहराच्या मध्यभागी चितळे रोड परिसरात असलेले नेहरू मार्केट, जे महानगरपालिकेने सुमारे १५ वर्षांपूर्वी भुईसपाट केले, तेथे असलेल्या भाजी व फळ विक्रेत्यांची दयनीय अवस्था आहे. त्यांच्या हक्काची जागा विना वापर पडलेली असून, त्यावर तातडीने बीओटी तत्त्वावर निविदा काढून पुण्याच्या धर्तीवर नवीन भाजी मार्केट तयार करण्यात यावे, जेणेकरून विक्रेत्यांना योग्य सुविधा मिळतील आणि नागरिकांनाही सोयीस्कर ठरेल. यामुळे शहराच्या वैभवात देखील भर पडेल.आपण या महत्त्वाच्या विषयांवर तातडीने कार्यवाही करावी असे केशरी प्रतिष्ठानने निवेदनात म्हटले आहे. निवेदन देताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश लालबागे, सुरज जाधव व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# मनोरंजन व खेळातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास

## मनीषकुमार । आठरे पाटील पब्लिक स्कूलमध्ये फनलॅण्ड कार्निवल धूमला उत्स्फूर्त प्रतिसाद

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



वर्षभर विद्यार्थ्यांना अभ्यासामुळे होणारा ताणतणाव कमी करण्यासाठी मनोरंजन आणि खेळ महत्त्वाचा आहे. मोबाइलच्या जमान्यात मुलांचे बालवयातील खेळ हरवले आहेत. आनंद मेळाव्यातून शारीरिक व बौद्धिक खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होईल. आठरे पाटील पब्लिक स्कूलचे उपक्रम कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन युनियन बँक ऑफ इंडिया उपक्षेत्राचे प्रमुख मनीषकुमार यांनी केले.

अहिल्यानगर शहराच्या सावेडी विभागातील आठरे पाटील पब्लिक स्कूल च्या प्रांगणात फनलॅण्ड कार्निवलचे उद्घाटन युनियन बँक ऑफ इंडिया उप क्षेत्राचे प्रमुख श्री. मनीषकुमार यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले, त्यावेळी श्री. मनीषकुमार बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठरे पाटील, उद्योजक जनक आहुजा, विश्वस्त डॉ. अंजली आठरे पाटील, विश्वस्त डॉ. अदिती आठरे, मानसिंग आठरे पाटील आदी उपस्थित होते. यावेळी सोनिक निकोलोडीयन टीव्ही चॅनेलचा कलाकार शिवा कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण ठरला. शिवाने डान्स करून प्रेक्षकांची मने जिंकली. शाळेतील मुलांनी शिवाला बघण्यासाठी गर्दी केली होती. मुलांना शिवा सोबत सेल्फी काढण्याचा मोह आवरला नाही.

होम मिनिस्टर स्पर्धेत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. नृत्य स्पर्धा, संगीत, अश्वरोहण, जलतरण,बलून शुटिंग, ट्रॅम्पोलिन, आर्चरी, वॉटर झॉरबिंग, बंजी जंम्पिंग, ॲन्ग्री बर्ड, व्हिल ऑफ फॉर्च्यून, बोट रेसिंग, बॉल इन क्लाऊन, डिस्क डॉप, अंडर ओव्हर लकी सेव्हन, बंजी रन, बुल राईड, मेरी गो राउंड, डी. जे. कॉर्नर, एलिमिनेटर, बाऊसिंग कासल या सारख्या अनेक मनोरंजनात्मक खेळांचा मनसोक्त आनंद घेऊन मुलांनी फुल टू धमाल मस्ती करून स्वादिस्ट व रुचकर व्हेज व नॉन व्हेज खाद्यपदार्थांच्या मेजवानीचा आनंद घेतला. या सर्व खेळांमध्ये जिंकलेल्या विद्यार्थ्यांना गिफ्ट देण्यात आले. डॉ. आदिती आठरे म्हणाले, या फनलॅण्ड कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे मुलांमध्ये व्यक्तिमत्त्व विकास, व्यवहार ज्ञान, संभाषण चातुर्य विकसित करण्याबरोबरच त्यांना आर्थिक देवाण घेवाण बद्दलचे ज्ञान माहिती करणे हा असून या मेळाव्यासाठी नगरकरांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला आहे.